नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/01/2021 (गुरूवार)
(दुपार)

---

## पोलीस स्टेशन खापरखेडा येथील खुनातील आरोपीतांना 24 तासाचे आत स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथकाने केले गजाआड....

पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत मृतक नामे प्रशांत मुकेश घोडेस्वार वय 30 वर्ष रा. वार्ड 4 खापरखेडा याचा पानठेला लावलेल्या जागेचे कारणावरून एक महीण्या अगोदर सुधीर पिंपळे याचे सोबत भांडण झाले होते. आरोपी सुधीर पिपळे याने मृतकाला त्याचा पानठेला बाजुला करून ती जागा सागर माहूरकर याला 1,00,000/–रूपयामध्ये विकले होते. यातील मृतकाचा पानठेला असलेल्या जागेचा मोबदला मिळण्याकरीता मृतकाने सुधीर पिपळे यास वारंवार 50,000/– रूपये मिळण्याकरीता तगादा लावुन नेहमी वादविवाद करीत होता. काल दि. 20/01/2021 चे रात्री 9.45 वा.चे सुमारास सुधीर पिपळे हा आपला मित्र सागर माहूरकर, कासीम पठाण, सुलतान गडकनोजे, आशिष भड व आनंद शिंदे यांचेसह खापरखेडा येथील राजबाबा बार मध्ये दारू पित असतांना त्याठिकाणी यातील मृतक प्रशांत घोडेस्वार हा आला. व त्याने सुधीर पिपळे यास जागेचा मोबदला म्हणुन 50,000/–रुपयाची पुन्हा मागणी केली. त्यादरम्यान त्याच्यामध्ये वादविवाद झाला. काही वेळाने प्रशांत घोडेस्वार हा राजबाबा बार मधुन बाहेर निघताच यातील मृतक प्रशांत घोडेस्वार हा वारंवार करीत असलेल्या पैशाच्या मागणीला कंटाळुन आरोपी नामे सुधीर पिंपळे व त्याचे सोबत असलेले मित्र आरोपी नामे सागर माहूरकर, कासीम पठाण, सुलतान गडकनोजे, आशिष भड व आनंद शिंदे यांनी संगनमत करून मृतक नामे प्रशांत घोडेस्वार याच्या सोबत पुन्हा वाद विवाद करुन हातबुक्कीने मारहाण केली. त्यानंतर धारधार चाकुने गळा कापून गंभीर जखमी करुन जागीच ठार केले. व घटनास्थळावरून पसार झाले. सदर घटनेची माहिती स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री.अनिल जिट्टावार यांना प्राप्त होताच त्यांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहुन आपल्या अधिनस्त पथकास मार्गदर्शन करुन वरील नमुद फरार आरोपीतांचा शोध घेवुन ताब्यात घेण्याबाबत आदेश दिले. त्यानुसार यातील आरोपी हे घटनेनंतर अमरावती रोडनी पळुन गेल्याचे समजले. त्यावरुन गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी हे मुर्तीजापूर त अकोला या मार्गावर असल्याचे माहिती झाल्याने आरोपीतांचा मागोवा घेत असतांना यातील आरोपी नामे 1) कासीम अयुब पठान वय 38 वर्ष 2) सागर कृष्णराव माहूरकर वय 30 वर्ष 3) सुंधीर भागवतराव पिपळे वय 36 वर्ष 4) आशिष सुरेश भड वय 31 वर्ष 5) सुलतान रहीम गडकनोजे वय 20 वर्ष, सर्व राहणार खापरखेडा हे बोरगांव (मं) या गावात मिळुन आल्याने त्यांना त्याठिकाणाहुन स्टापच्या मदतीने ताब्यात घेतले. तसेच यातील आरोपी क्र.6 नामे आनंद रामभाउ शिंदे वय 30 वर्ष सर्व रा. खापरखेडा यास दहेगाव (रंगारी) येथुन ताब्यात घेवुन पुढील कार्यवाहीकरीता नमुद सहा ही आरोपीतांना पोलीस स्टेशन खापरखेडा यांचेकडे सुपुर्द करण्यात आले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण,यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, सपोनि राजीव कर्मलवार,जितेन्द्र वैरागडे, पोउपनि जावेद शेख सफौ.लक्ष्मीप्रसाद दुबे, पो.हवा विनोद काळे, नापोशि रामा आडे, अरविंद भगत,सत्यशिल कोठारे,शैलेश यादव, राजु रेवतकर पोशि विरेन्द्र नरड,रोहन डाखोरे, सतिष राठोड यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर